वाचले:-
१) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि. २३/०९/२०२४ चा पदे भरणेबाबत मान्य प्रस्ताव
२) वायसीएमएच/११/कावि/१०४२/२०२४ दि. ०५/१२/२०२४
३) मा.स्थायी समिती, मा. प्रशासक यांचेकडील ठराव क्रमांक
४) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.२५/०१/२०२५ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय,पदव्युत्तर संस्था
जा.क्र. वायसीएमएच/११/कावि/६८/२०२५
दि.:- २५/०१/२०२५.

विषय:- पिंपरी चिंचवड मनपाचे पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरिता तात्पुरत्या स्वरुपात तज्ञ वैद्यकिय अधिकारी (कन्सल्टंट) नेमणुकी बाबत..

आदेश,

पिंपरी चिंचवड मनपाचे पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरिता तात्पुरत्या स्वरुपात तज्ञ वैद्यकिय अधिकारी (कन्सल्टंट) नेमणुक करणेबाबत वाचले क्र. १ अन्वये मान्यता दिली आहे.वाचले क्र. २ अन्वये जाहिरात मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दिनांक १२/१२/२०२४ रोजी थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW) आयोजीत करण्यात आल्या होत्या.

सदर थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW) साठी भुलशास्त्र विभाग व क्ष किरण विभागासाठी फक्त प्रत्येकी १ उमेदवार उपस्थित असलेने त्यांची निवड करणेत आली असुन न्युरोसर्जरी विभागासाठी एकुण ३ उमेदवार उपस्थित असलेने मार्किंग पॅटर्ननुसार निवड झालेले व प्रतिक्षा- १ व २ नमुद केले आहे. तसेच दंतरोग विभागासाठी २१ उमेदवार थेट मुलाखती ( WALK IN INTERVIEW ) साठी उपस्थित होते मार्किंग पॅटर्ननुसार निवड झालेले व प्रतिक्षा- १ व २ नमुद केलेले आहेत.

मा. आयुक्त सो. यांचे मान्य गुण गणनानिर्धारण तक्त्यानुसार " दोन उमेदवारांनी समान गुण प्राप्त केल्याच्या स्थितीत पदव्युत्तर अर्हता परिक्षेमध्ये जादा गुण (टक्केवारी) असणा-या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल." त्यानुसार दंतरोग विभागासाठी Oral Surgeon (कन्सल्टंट) ची निवड करणेत आलेली आहे.

निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांस त्यांच्या नावापुढील पदावर स्तंभ क्र. ७ मध्ये नमुद विभागात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पदनाम | शैक्षणिक अर्हता | दरमहा मानधन | नेमणुक कालावधी | नेमणुक विभाग | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | डॉ.कदम प्रितमकुमार राजेंद्र | भुलतज्ञ (कन्सल्टंट) | MBBS/ MD/DNB | १२५०००/- | दि२५०१/२०२५ ते दि.२६/१२/२०२५ | भुलशास्त्र विभाग | 9422030585 |
| २ | डॉ. जमादार खलील दस्तगीर | रेडिओलॉजिष्ट (कन्सल्टंट) | MBBS/ DMRD/DNB | १२५०००/- | दि२५०१/२०२५ ते दि.२६/१२/२०२५ | क्ष-किरण विभाग | 7722045645 |
| ३ | डॉ. मगदूम अभिनंदन अशोक | न्युरोसर्जन (कन्सल्टंट) | MBBS/ DrNB(Neuro) | १२५०००/- | दि२५०१/२०२५ ते दि.२६/१२/२०२५ | न्युरोसर्जरी विभाग | 9970846881 |
| ४ | डॉ. हरणखेडकर नेहा अभिनय | Oral Surgeon (कन्सल्टंट) | BDS / MDS | १२५०००/- | दि२५०१/२०२५ ते दि.२६/१२/२०२५ | दंतरोग विभाग | 9823024992 |

अटी शर्ती

१. तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांना कंत्राटी करारनामामध्ये नमुद तसेच जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी-शर्ती बंधनकारक राहतील.
२. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी आदेशासोबत जोडणेत आलेला कंत्राटी करारनामा र.रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर रुजु होताना नोटराईज्ड करुन देणे बंधनकारक राहिल.
३. उक्त नमुद पदाचा कामकाज कालावधी आदेशाचे दिनांकापासुन ११ महिने राहिल.

४. उमेदवारांना दरमहा कंत्राटी सेवा कालावधीत उपस्थित दिवसांचे एकवट मानधन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे व नियमानुसार अनुज्ञेय असेल. उमेदवारांना महापालिकेच्या अस्थापनेवरिल नियमित कर्मचा-यांकरिता असलेल्या लाभदायी योजना लागू होणार नाही व मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही आर्थिक फायदे मिळणार नाहीत. उदा. बोनस व सानुग्रह अनुदान, वैद्यकिय प्रतिपुर्ती इ.

५. नेमणुकीच्या सुरवातीचे दीड महिना कालावधीत किरकोळ रजा अनुज्ञेय राहणार नाही. आठवडयातुन फक्त एक दिवस रुग्णालय/ दवाखान्याच्या सोयीनुसार साप्ताहीक सुटटी राहील. परंतु ऑन कॉल ड्युटी करावीच लागेल. नियुक्तीचे कालावधीत दिड महिना काम केलेनंतर १ प्रमाणे किरकोळ रजा देय राहतील. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुटटीच्या दिवशी बाहयरुग्ण विभागाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुटटी उपभोगता येईल (शिफ्ट ड्युटी व रात्रपाळीत कामकाज करणारे तज्ञ वैद्यकिय अधिकारी वगळून) तथापि सदर दिवशी ऑन कॉल ड्युटी करावीच लागेल. तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी केलेल्या कामकाजाबाबतचा कोणताही अर्थिक मोबदला / फायदे देय राहणार नाहीत.

६. नमुद तज्ञ वैदयकीय अधिकारी यांचे कामकाजाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार विभागप्रमुख / मा. अधिष्ठाता यांना राहतील.

७. सदर नेमणुक ही पुर्णपणे तात्पुरत्या/हंगामी स्वरूपाची आहे. व स्थानिक परिस्थिती व गरजेनुसार करणेत आली आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही. व तशी अस्थापनेवर वेतनश्रेणीत नेमणुक मिळावी म्हणुन निवेदन सादर करता येणार नाही किंवा तसा बाह्य दबाब आणणार नाही. कोणत्याही मे. न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र/करारनामा सादर करावे लागेल.

८. नेमणुक झालेली सेवा तात्पुरती असुन,महापालिकेस आवश्यकता नसलेस,कोणतीही पुर्वसुचना न देता आपणांस कार्यमुक्त करण्यात येईल.

९. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद / महाराष्ट्र दंतवैद्यक परिषद च्या अंतर्गत आपल्या नावाची नोंदणी करणे रजिस्टरमध्ये नाव समाविष्ठ असणे आवश्यक आहे.

१०. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवास भत्ता, इतर सवलत मिळणार नाही.

११. उमेदवाराने संस्थेच्या व कामाच्या प्रती एकनिष्ठता ठेवणे अपेक्षित आहे. कंत्राटी पदाची नियुक्तीचे पदावर काम करताना आपणाकडुन सर्वांना नि:पक्षपातीने वागणुक मिळणे आवश्यक आहे. कामासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपणावर राहील.

१२. नेमणुकीच्या विभागात तज्ञ वैद्यकिय अधिकारी (कन्सल्टंट) यांनी हजर राहणे बंधनकारक असुन, विनापरवानगी गैरहजर आढळुन आल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांच्या कामाबाबत विभागप्रमुख/अधिष्ठाता यांचेकडे काही तक्रारी प्राप्त असल्यास,सबंधितास तशी सक्त ताकीद देण्यात येईल त्यानंतरही कामात विशेष सुधारणा न झाल्यास त्यांना कामावरून कमी करणेबाबत कार्यवाही केली जाईल.

१३. सदर नेमणुक ही अस्थायी असल्यामुळे नेमणुक कालावधी पुर्ण होताच सदर नेमणुक आपोआप संपुष्टात येईल.

१४. आपण या आदेशाप्रमाणे नेमणुक स्वीकारल्यास व दिलेल्या ठिकाणी रुजू झाल्यास वरील अटी व शर्ती आपणास मान्य आहेत, असे गृहीत धरण्यात येईल.

१५. नेमणुक झालेल्या उमेदवारास सदर पद/नोकरी सोडताना किमान एक महिन्याची पुर्वसुचना देणे बंधनकारक राहील.अन्यथा त्यांना एक महिन्याचे मानधन महापालिका कोष।गारात जमा करावे लागेल. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडुन गेल्यास त्या महिन्याचे हजर दिवसांचे मानधन अदा केले जाणार नाही. तसेच एक महिन्याचे मानधन कोषागारात जमा केलेशिवाय अनुभव प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

१६. सामान्यत: तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांचे कामकाजाची वेळ सकाळी ९:०० ते सांयकाळी ५:०० पर्यंत राहील. तथापि रुग्णालयीन कामकाज २४ X ७ चालु असले कारणाने रुग्णसेवेच्या दृष्टीने संबधित विभागप्रमुख अथवा अधिष्ठाता यांनी सुनिश्चित केलेल्या वेळेनुसार त्यांनी काम करणे बंधनकारक राहील.कामावर येताना व जाताना नियमित बायोमेट्रीक पध्दतीने विभागप्रमुखांनी सुनिश्चित केलेल्या विहीत वेळेनुसार थम्ब इंम्प्रेशन करुन व हजेरी मस्टरवर स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. रुग्णालयाचे /विभागाचे आवश्यकतेनुसार ईमर्जन्सी ऑन कॉल ड्युटी व त्या दरम्यान आवश्यक रुग्णालयीन प्रशासकिय कामकाज करणे बंधनकारक राहील. ज्या दिवसांचा थम्ब व हजेरी मस्टरवर स्वाक्षरी नसेल त्यादिवसांचे मानधन अदा केले लाणार नाही. थम्ब इंप्रेशन करताना वेळेत करणे आवश्यक आहे. लेट झाल्यास तीन लेट मागे एक दिवसाचे वेतन कपात करणेत येईल. याकामी शाखाप्रमुख नी हजेरी पत्रक/बायोमेट्रीक थम्ब इंम्प्रशन पडताळणी करुन स्वाक्षरीसह सादर करणे बंधनकारक आहे. व त्यानुसार अनुभव प्रमाणपत्र दिले जाईल.

१७. कामावर वेळेत हजर राहुन ओळखपत्र परिधान राहील. अन्यथा दंडात्मक कारवाई करणेत येईल.

१८. नेमणुक झालेल्या उमेदवारांनी रूजू झालेवर, त्यांचे वेतन अदा करणे सोईचे होणेकरीता बँक ऑफ बडोदा पी.सी.एम.सी शाखा मुख्य कार्यालय पिंपरी पुणे -१८ येथे खाते उघडून, खाते क्रमांक व ई. सी. एस. फॉर्म भरून सोबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून शाखा प्रमुखांमार्फत संबधीत पगार लिपिकाकडे सादर करणेत यावी. सदर पुर्तता वेळेत न केलेस व पगारास विलंब झालेस त्यास रूग्णालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१९. नेमणुक झालेल्या उमेदवारांनी मा. अधिष्ठाता, यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार कामकाज करावयाचे आहे.यामध्ये टाळाटाळ अथवा हलगर्जीपणा केल्यास त्यांचा कार्यकाल खंडीत करण्यात येईल.

२०. नेमणुक केलेल्या उमेदवारांनी रुग्णालयीन सोयीनुसार पि.चि.मनपाच्या इतर रुग्णालयात/विभागात आवश्यकतेनुसार कामकाज करणे बंधनकारक आहे.

२१. सदर आदेशातील उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलली व्यक्तीगत माहीती व मुळ कागदपत्राच्या प्रती खोट्या / बनावट असलेचे आढळुन आल्यास भारतीय दंड संहिता कलम १९९ व २०० मधील तरतुदीनुसार उमेदवार कारवाईस पात्र राहील.

२२. सदर आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्यास इंडीयन कॉन्ट्रॅक्ट अॅक्ट मधील कलम ७३ चे तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करणेत येईल

२३. आयकर नियमाप्रमाणे कंत्राटी वेतनाचे रक्कमेतून TDS व नियमानुसार इतर वजावटी करून अंतिम देय रक्कम अदा करणेत येईल.

२४. उमेदवांरानी विहीत दिनांकापासून ०३ दिवसाचे आत वैद्यकिय मुख्य कार्यालयात रुजू होणे आवश्यक आहे. रुजू होते वेळी कागदपत्रांच्या मुळ प्रती व अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र तपासणीसाठी आणणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत रूजू न झालेस आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. व त्यामुळे रिक्त पदांवर अन्य उमेदवारांची नियुक्ती करणेत येईल. तदनंतर याबाबत आपले म्हणणे विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

( शेखर सिंह )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी.१८-

प्रति:- डॉ . तज्ञ वैद्यकिय अधिकारी